(CNRMHSN110008412022)

<u>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३४९/२०२२**</u>

<u>**निशाणी २४ लगत**</u>

<u>**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा पुढील सरतपास वकील श्री.व्ही.बी.पाटील यांचेमार्फत शपथेवर सुरु**</u>

९. माझे नाव ज्ञानेश्वर शामराव पाटील असे असून माझ्या सरतपासातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. मी आरोपीला ओळखतो. याकामी मी निशाणी ३/१ कडे मी दिनांक ०७/०६/२०२२ रोजीचा धनादेश क्र.००००२१ सादर केलेला आहे. त्यावर आरोपीची सही आहे. सदर सही मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(सदर धनादेशाला परक्राम्य दस्ताऐवज अधिनियम १८८१ चे कलम ११८ व १३९ अन्वये गृहीतक असल्यामुळे त्याला निशाणी क्र.३० देण्यात येते.)** सदरचा चेक मी सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेतील माझ्या खातेवर भरला असता सदरचा चेक अनादरीत झाल्याबाबत बँकेचा मेमो आला. सदर मेमो निशाणी ३/२ वर दाखल केला असून सदर मेमो आता मला दाखविण्यात आला असून त्यावर बँकेचा शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(सदर मेमोला परक्राम्य दस्ताऐवज अधिनियमचे कलम १४६ अन्वये गृहीतक असल्यामुळे त्याला निशाणी क्र.३१ देण्यात येते.)**

१०. त्यानंतर चेक अनादरीत झाल्याबाबत मी आरोपीला वकीलांमार्फत नोटीस पाठवली. सदर नोटीस निशाणी ३/४ वर दाखल असून सदर नोटीस आता मला दाखविण्यात आली. त्यावरील सही माझी आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(नोटीशीस निशाणी क्र.३२ देण्यात येते.)** सदरची नोटीस मी रजिस्टर पोस्टाने पाठवली आहे. त्याबाबतची पावती मी

निशाणी ३/५ वर दाखल केली आहे. आता मला सदरची पावती दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(पोहोचपावतीस निशाणी क्र.३३ देण्यात येत आहे.)** सदरची नोटीस आरोपीला प्राप्त झालेबाबत पोस्टाचा ऑनलाईन ट्रॅकिंग रिपोर्ट मी हजर केलेला आहे. सदरची नोटीस प्राप्त होवून देखील आरोपीने चेकची रक्कम मला परत दिलेली नाही. सदरकामी रजिस्टर पोस्टाची पोहोच पावती मला प्राप्त झाली नाही. त्यामुळे मी दिनांक २९/०७/२०२२ रोजी पोस्ट ऑफिसमध्ये तक्रारी अर्ज दाखल केला. सदर अर्जाची पोहोच याकामी दाखल केली आहे. सदर स्थळप्रत आता मला दाखविण्यात आली. त्यावर माझे वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(सदर अर्जास निशाणी क्र.३४ देण्यात येत आहे.)**

११. आरोपी सध्या सांगोला येथे रहावयास आहे. सदर केसचे समन्स त्याला सांगोला येथील पत्त्यावर काढण्यात आले होते. सदरकामी पोलीसांनी वॉरंट सांगोला येथील पत्त्यावर बजावले आहे. पोलीसांनी आरोपीला सांगोला येथे अटक केली आहे. आरोपी हा सांगोला येथे सलूनचा व्यवसाय करतो. पोहोच मिळाले नसल्याबाबत मी

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

### <u>फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.टी.आर.माडगुळकर यांचेमार्फत सुरु</u>

१२. माझे सध्या वय ६५ वर्ष आहे. आरोपीचे वय ४० वर्ष असेल. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व माझ्यामध्ये २२ वर्षांचे अंतर आहे. गावी माझी शेतजमीन असल्याबाबतचा कोणताही कागद मी याकामी हजर केलेला नाही. आरोपी हे मौजे आटपाडी येथील कायमचे रहिवाशी असल्याबाबतचा कोणताही

कागद मी याकामी हजर केलेला नाही. मी स्वतः आटपाडीचा रहिवाशी असल्याबाबतचा कोणताही कागद मी याकामी हजर केलेला नाही. मी रिटायर्ड पेंशनर असल्याबाबतचा कोणताही कागद मी याकामी हजर केलेला नाही. आरोपीचा सलूनचा व्यवसाय आटपाडी येथे असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा मी याकामी हजर केलेला नाही.

१३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने तथाकथीत र.रु.२,५०,०००/- ची मागणी केल्याबाबतची तारीख वार याकामी नमूद केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, महेश ज्ञानेश्वर पाटील हा माझा मुलगा आहे. दिपक बाळासाहेब देशमुख हा माझ्या मुलाचा मित्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा माझ्या मुलाचा मित्र आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, आरोपी माझा देखील मित्र आहे.

**वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ASHWINI JOTIRAM BACHULKAR

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR Date: 2025.03.28 11:31:03 +0530

आटपाडी. (अ. जो. बाचुळकर)

दिनांक : २७/०३/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

आटपाडी

*****